"दुष्टांच्या दुष्कृत्यामुळे नाही तर सज्जनांच्या निष्क्रियतेमुळे समाज बिघडतो"

# स्वयंसिद्धा महिला मंडळ, लातूर
# SWAYAMSIDDHA MAHILA MANDAL

**H.O. :** Vishva sadan, Vivekanadpuram, Latur - 413512
**S.H.:** P 69, MIDC, Latur - 413512 (Maharashtra)
**Mob.** 8390906712/40, 8390906715/19/20/23/11/24

**Email :** smparchure24@gmail.com
hgdixit1971@gmail.com
**URL :** www.swayamsiddha.in

**Coop. Society Regn. No.** Maha/6120/Latur dated 15.02.1996 **Public Trust Regn. No.** F 5749(Latur) dated 02.07.1998 **NITI Aayog** - Darpan Regn. No. MH/2016/0101097
**SSI Regn. No.** MH16B0004742 dtd.01.09.2018 **SBI Bank Ac :** Cur.ac no.30140917716 IFSC:SBIN0006756 **PAN No. :** AABTS9369M

स्वयंसिध्दा महिला मंडळ लातूरद्वारा संचलित

कौटुंबिक सल्ला केंद्र औसा ता. औसा जि. लातूर

## यशस्वी केस तपशील

सौ प्रियंका, हिचे लग्न १२ जून २०१५ ला श्री सुनिल याचे सोबत झाले. घरांत सासू सासरे व नणंद आहे. सुरूवातीला सौ प्रियंका हिला मुलगी होईपर्यंत सर्वांनी व्यवस्थीत नांदवले. पण तिला दिवस राहिले तेंव्हा संशयावरून हे मूल माझे नाही, तू ''पाडून'' टाक म्हणून सतत मानसिक त्रास व मारहाण नवरा करू लागला.

सासू सासरे व नणंदही प्रियंकाचा अतिशय शारिरीक व मानसिक छळ करीत असत, त्यामुळे व मारहाणीमुळे प्रियंका खुप दु:खी होती. कांही दिवस ती बहिणीकडे राहिली. पण परत सासरी आल्यावर तर जास्तच त्रास सर्वजण देऊ लागले.

शेवटी आत्महत्या करण्याचे विचार तिच्या मनांत येऊ लागले. पण बहिणीने तिला समजावले ''तुला लहान मुलगी आहे तेंव्हा असे कांही जिवाचे बरेवाईट करू नको. आजकाल चांगल्या संस्थेतून सल्ला मिळतो. तिथे तक्रार कर'' असे तिने सांगितल्यानंतर प्रियंकाने स्वयंसिध्दा महिलामंडळाच्या औसा केंद्रात तक्रार दाखल केली.

त्यानंतर २ ते ३ वेळा सासू सासरे नणंद व पती यांना बोलावून समुपदेशन केले.

त्यानंतर हळूहळू परिस्थिती मधे चांगला बदल होऊन आता घरांतील सर्वजण प्रियंकाशी व्यवस्थीत वागत आहेत. त्यामुळे तिची मन:स्थिती सध्या चांगली आहे. नुकतीच ती व तिचा नवरा दोघेही केंद्रात येऊन समाधानात असल्याचे सांगून गेले.

समुपदेशनाचा योग्य परिणाम होऊन एका अन्यायग्रस्त महिलेचा संसार पुन्हा सुरळीत मार्गी लागला म्हणून समाधान वाटले.